SHYAMKAMAL INVESTMENTS LIMITED

CIN: L65990MH1982PLC028554
Regd. Office: Shop 25, Lower Ground Floor, Target - The Mall, Chandavarkar Road, Opp. BMC Ward off, Borivali (W), Mumbai, 400092
Corporate Office: 301, Shail's Mall, Nr. Girish Cold Drinks, Navarangpura, Ahmedabad - 380009
Email: shyamkamalinvt@gmail.com **Mobile:** +91 79907 33924

Date: 14th August, 2026

To,
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Tower,
Dalal Street,
Mumbai – 400 001

Sub: Newspaper Advertisement of Extract of Statement of Unaudited Financial Results for the Quarter ended on 30th June, 2026

Ref: Security Id: SHYMINV / Code: 505515

Dear Sir/Ma'am,

Pursuant to Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Company has given Newspaper Advertisement on 14th August, 2026 of extract of Unaudited Financial Results for the Quarter ended on 30th June, 2026, in:

1. English Newspaper – News Hub Newspaper and
2. Regional Language Newspaper (Marathi) – Pratahkal Newspaper

Kindly take the same on your record and oblige us.

Thanking You.

Yours Faithfully,

For, Shyamkamal Investments Limited

Jatinbhai Virendrabhai Shah

Digitally signed by Jatinbhai Virendrabhai Shah
DN: c=IN, o=Personal, title=3278, pseudonym=15e23bcf7a6c4500b0cb728615c27dcb, 2.5.4.20=c4b96ed80b4ef2a51607718af4aff8f0f9941e8864437e0b1b7de67d1d3e244e, postalCode=380007, st=Gujarat, serialNumber=4e84897d517e9d9f041f344e136162dade7ac593af872ed268e3dd026b106c63, cn=Jatinbhai Virendrabhai Shah
Date: 2026.08.14 18:35:40 +05'30'

Jatinbhai Virendrabhai Shah
Managing Director
DIN: 03513997

'Har Ghar Tiranga 2026' campaign in full swing in Thane

Appeal to follow the flag code

Thane ,Dinesh Singh : Under the Government of India's 'HarGharTiranga 2026' campaign, the national flag will be hoisted in Thane district by citizens, private organizations, educational institutions and various establishments. Against this backdrop, the administration has clarified that it is mandatory to strictly follow the provisions of the Indian Flag Code while hoisting the national flag.The Assistant Director, Directorate of Cultural Affairs, Mumbai has issued the following guidelines regarding this campaign.This campaign is being implemented from 9 August 2026 to 17 August 2026. During this period, citizens can hoist the national flag at their homes or establishments. As per the Central Government's July 2022 amendment to the Flag Code, the national flag hoisted in open spaces or on citizens' homes can be hoisted both during the day and night. There is no specific time or day restriction for hoisting the national flag during the campaign period. Citizens can hoist the national flag at any time as per their convenience. The administration has appealed to all concerned citizens and institutions to take special care to ensure that its sanctity, dignity and respect are maintained at all times while hoisting the national flag.

ज्येष्ठ नागरिकांसाठी सहाय्यक उपकरणांचे तपासणी शिबिर

विरार, दि. १३ (वार्ताहर) : वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग आणि भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी सहाय्यक उपकरणे मोफत वाटप करण्यासाठी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील दुसऱ्या मजल्यावर, यशवंत नगर, विरार पश्चिम येथे होणार आहे. महापालिकेच्या प्रभाग समिती 'ए' बोळींज, 'सी' चंदनसार आणि 'ई' नालासोपारा पश्चिम या प्रभागांच्या कार्यक्षेत्रातील पात्र ज्येष्ठ नागरिकांना या शिबिराचा लाभ घेता येणार आहे. प्रधानमंत्री दिव्याशा केंद्राच्या माध्यमातून सहाय्यक उपकरणांचे मोफत वाटप करण्यात येणार असून, त्यासाठी पात्र लाभार्थ्यांची तपासणी शिबिरात केली जाणार आहे.

शिबिरासाठी लाभार्थ्यांकडे पिवळे किंवा केशरी रेशनकार्डाची रंगीत स्वसाक्षांकित प्रत असणे आवश्यक आहे. तसेच कुटुंबाचे मासिक उत्पन्न १५ हजार रुपये किंवा वार्षिक उत्पन्न १ लाख ८० हजार रुपयांच्या आत असल्याचा उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे. यासाठी नगरसेवक किंवा नगरसेविकेचा दाखला, रेशनकार्डावर नमूद केलेले उत्पन्न किंवा स्वयंघोषणापत्र यापैकी संबंधित कागदपत्र ग्राह्य धरले जाणार आहे. ज्येष्ठ नागरिक असल्याचा पुरावा म्हणून आधारकार्डाची स्वसाक्षांकित प्रत सादर करावी लागणार आहे.

पात्र ज्येष्ठ नागरिकांनी तपासणी शिबिराला येताना वरील कागदपत्रांसह मूळ रेशनकार्ड आणि मूळ आधारकार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच संबंधित संस्थेकडून मागील तीन वर्षांत सहाय्यक उपकरणांचा लाभ घेतलेला नसावा, अशी अट आहे. पात्र ज्येष्ठ नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह शिबिरात उपस्थित राहून या मोफत सहाय्यक उपकरण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

केडीएमसी शाळांतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सत्कार

डोंबिवली, दि. १३ (वार्ताहर) : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका शाळांमधील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा शिक्षण समिती सभापती अभिजित सदानंद थरवळ आणि मनसे नगरसेवक तथा शिक्षण समिती सदस्य प्रल्हाद म्हात्रे यांनी शाळेत जाऊन सत्कार केला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचे कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

संत नामदेव शाळा क्रमांक ६७, कुंभारखानपाडा, डोंबिवली पश्चिम येथील वेदेश मंजुनाथ नाईक याने गुणवत्ता यादीत २३६ वा क्रमांक मिळवला. तसेच संत रामदास प्राथमिक विद्यालय क्रमांक ३२, अटाळी, टिटवाळा येथील सक्षम सीताराम जैस्वाल याने गुणवत्ता यादीत ३४६ वा क्रमांक मिळवत यश संपादन केले. दोन्ही विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.या वेळी शिक्षण समिती सभापती अभिजित सदानंद थरवळ, नगरसेवक तथा शिक्षण समिती सदस्य प्रल्हाद म्हात्रे, नगरसेविका तथा शिक्षण समिती सदस्य अपर्णा भोईर, महापौरांचे पती विजय चौधरी, प्रशासन अधिकारी भारत बोरनारे आणि शिक्षण अधिकारी विजय सरकटे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या यशात शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.